शिक्षक प्रशिक्षण या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील पहिल्या हप्त्याचा उर्वरीत निधी शासनाच्या अनुसूचित जनजाती उपयोजना (TSP Head) लेखाशीर्षातून वेतन व इतर बाबींसाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः अनुवि- २०१८/(११४/१८)/प्रशिक्षण
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२,
दिनांक:-२६ मार्च, २०१९

<u>वाचा</u> - १) मनुष्यबळ व विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ ७-२/२०१८-IS-१२(ST), दिनांक - ११/०९/२०१८

<u>प्रस्तावना -</u>

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत अनुसूचित जनजाती उपयोजना (TSP Head) या लेखाशीर्षातंर्गत दि. ११/०९/२०१८ च्या पत्रान्वये वेतन व इतर बाबींसाठी रु. २८.३० लक्ष इतका पहिल्या हप्त्याचा उर्वरीत निधी उपलब्ध करून दिलेला असून, केंद्र-राज्य हिश्याचे प्रमाण ६०:४० यानुसार राज्य हिस्सा रु. १८.८७ लक्ष असा एकूण रु. ४७.१७ लक्ष सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी केंद्र व राज्य हिस्साचा पहिल्या हप्त्याचा उर्वरीत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

शिक्षक प्रशिक्षण या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत अनुसूचित जनजाती उपयोजनेच्या (TSP Head) लेखाशीर्षाखाली केंद्र शासनाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता पहिला हप्ता रु. २८.३० लाख वितरित केलेला आहे. केंद्र हिश्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा ४०% रु.१८.८७ लाख इतका आहे. असा एकूण रु.४७.१७ लक्ष इतका निधी खालील विवरण पत्रानुसार वितरीत करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

पहिला हप्ता	केंद्र शासनाच्या पत्राच दिनांक	केंद्र हिस्सा (६०%)	राज्य हिस्सा (४०%)	एकूण रुपये
TSP Head	दि. ११/०९/२०१८	२८.३०	१८.८७	४७.१७

सदर खर्च -**"मागणी क्र.टी-५ २२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)-जनजाती क्षेत्र उपयोजनेतंर्गत योजना (०१)(०१)-शिक्षकांचे प्रशिक्षण (२२०२।१६५) (केंद्र हिस्सा)"** व **"मागणी क्र.टी-५ २२२०२ - सर्वसाधारण शिक्षण,०१ प्राथमिक शिक्षण, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)-जनजाती क्षेत्र उपयोजनेतंर्गत योजना (०१)(०२)-शिक्षकांचे प्रशिक्षण (२२०२।२५४) (राज्य हिस्सा)"** या लेखाशीर्षातून सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात यावा. यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी व संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, ज्या उद्दिष्टांसाठी सदर निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच उद्दिष्टांसाठी खर्च करण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक वित्त विभागाच्या अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकामधील अटी व शर्तींच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२६१७१८३३२४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban
Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2019.03.26 17:22:58 +05'30'

(बी.आर.माळी)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र शासन, पुणे
३. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य, पुणे
४. संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे
५. संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे
६. संचालक (प्रौढ व अल्पसंख्याक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१/२), मुंबई/नागपूर
११.महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/नागपूर.

१३.सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD)

१४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१५.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६.वित्त विभाग (व्यय-५/अर्थसंकल्प-८), मंत्रालय, मुंबई.

१७.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मंजूर रक्कम बी.डी.एस.प्रणालीवर तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

१८. निवडनस्ती (प्रशिक्षण).